मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# वाकड- दत्तमंदिर रस्ता ४५ मीटर जागा ताब्यात घेणार : आयुक्त शेखर सिंह

## वाकड-दत्तमंदिर रस्ता विकास आराखड्याप्रमाणेच विकसित केला जाईल

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

हिंजवडी आयटी हब आणि पिंपरी-चिंचवडला जोडणारा प्रमुख दुवा वाकड-दत्तमंदिर रस्ता विकास आराखड्याप्रमाणेच विकसित केला जाईल. ४५ मीटर रस्ता रुंदीकरणासाठी अतिक्रमण हटवून जागा ताब्यात घेण्यात येईल, असे आश्वासन पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला. (झळाअॅळ) संबंधित रस्ता ४५ मीटर रुंद होईल, असा दावा केला होता. मात्र, प्रत्यक्षात काही ठिकाणी ३० मीटर रुंदीचाच रस्ता वाहनचालकांच्या माथी मारला जात आहे. त्यामुळे या भागातील एकूण २७ सोसायट्यांनी महापालिका प्रशासनाकडे लेखी तक्रारी केल्या आहेत. याबाबत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे उपाध्यक्ष सचिन लोंढे आणि प्रतिनिधी यांच्यासोबत महापालिका आयुक्त शेखर सिंह व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक महापालिका भवनात घेण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक विनायक गायकवाड उपस्थित होते.

वाकड-दत्तमंदिर रोड रुंदीकरणाबाबत स्थानिक सोसायटीधारकांनी आक्षेप घेतले आहेत. विकास आराखड्याप्रमाणे हा रस्ता ४५ मीटर होणे अपेक्षीत आहे. महापालिका प्रभाग क्रमांक २५ मध्ये असलेल्या वाकड-दत्तमंदिर रोडचे रुंदीकरण विकास आराखड्यातील नियोजनाप्रमाणे होत नाही. काही ठिकाणी अनिकृत बांधकामे आहेत. त्याला प्रशासनाकडून अभय



देण्यात येत असून, त्या ठिकाणी रस्त्याची रुंदी अगदी ३० मीटरपर्यंतच ठेवण्यात आली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुंना अनधिकृत बांधकामे आहेत. त्यामुळे रस्त्यांची रुंदी कमी झाली आहे. त्यामुळे विकास आराखड्यात मंजूर असलेल्या नियोजनाप्रमाणे सदर रस्त्याचे काम करावे, अशी परिसरातील सोसायटी धारकांची मागणी आहे. दरम्यान, याबाबत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप आणि माजी नगरसेवक विनायक गायकवाड यांनी सकारात्मक पुढाकार घेतला. त्यांच्या उपस्थितीमध्ये महापालिका आयुक्त व संबंधित अधिकारी व सोसायटीधारक प्रतिनिधी यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये विकास आराखड्याप्रमाणे ४५ मीटर रस्ता करण्याबाबत सर्वोतोपरी प्रशासन कार्यवाही करणार आहे. काही ठिकाणी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया काही दिवसांत सुरू करण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहे.

> “ वाकड- दत्त मंदिर रोड परिसरातील स्थानिक सोसायटीधारकांनी दत्त मंदिर रोड रुंदीकरणाबाबत नोंदवलेले आक्षेप रास्त आहेत. विकास आराखड्याप्रमाणे प्रशासनाने ४५ मीटर रस्ता नागरिकांसाठी उपलब्ध करुन द्यावा. त्यासाठी सध्या सुरु असलेल्या रस्त्याचे कामाची पाहणी करावी. अशी मागणी आम्ही प्रशासनाकडे केली.
>
> **– सचिन लोंढे,** उपाध्यक्ष,
> पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.

> “ दत्त मंदिर रस्ता रुंदीकरणाबाबत स्थानिक नागरिक, सोसायटीधारकांनी अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. याबाबत वारंवार चर्चा झाली आहे. त्यामुळे सोसायटीधारकांसोबत आयुक्त शेखर सिंह आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यामध्ये विकास आराखड्याची अंमलबजावणी करुन रस्ता रुंदीकरण करावे. या मार्गावरील वाहतुकीचा ताण पाहता प्रशासनाने गांभीर्याने उपाययोजना कराव्यात, अशी सूचना केली. याला आयुक्त शेखर सिंह व संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.
>
> **– शंकर जगताप,**
> शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# अतिक्रमणाविरोधात महापालिकेची धडक कारवाई

## क्षेत्रीय कार्यालयातंर्गत कारवाईची मोहिम

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी- चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील मोठ्या रस्त्यालगत, सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण, अनधिकृत पत्राशेड व वीट बांधकामांवर पालिकेकडून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. नागरिकांना सार्वजनिक रस्ते मोकळे करणे, रस्ते, जागा अनधिकृत बांधकामांपासून मोकळ्या करुन देणे हा कारवाईमागील उद्देश आहे. यामुळे सध्या महानपालिकेकडून अशा अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्यात येत आहे. शहरातील सार्वजनिक जागा नागरिकांच्या सोयीसुविधांच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांसाठी, विकासकामांसाठी तसेच सर्वांगीण कल्याणासाठी जतन करणे गरजेचे असून यामुळे शहराच्या सर्वांगीण विकासामध्ये भर पडण्यास मदत होणार आहे, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. शहरातील अनधिकृत व्यवसायिक पत्राशेड धारकांद्वारे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले जात असून रस्त्यावरच वाहने उभी केल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या वाहतूकीस अडथळा निर्माण होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून बकालपणा वाढत आहे. या अडथळ्यांमुळे लहान-मोठे अपघातसुध्दा होत आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावर आणि शहराच्या पर्यावरणावर परिणाम होत आहे.

# अनधिकृतरित्या वृक्षांची छाटणी करणाऱ्यांवर महापालिका कायदेशीर कारवाई करणार

## प्रशासनाकडून ७ होर्डिंग धारकांचे परवाने रद्द

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरामध्ये विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करुन त्याचे संगोपण सुध्दा केले जाते. शहर सुंदर स्वच्छ व हरित करण्यासाठी महापालिका दरवर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये त्याबाबत तरतुद करुन त्यावर खर्च करते. परंतू काहींकडून मनपाने संगोपन केलेले वृक्षांची नासधूस करुन सदर कामामध्ये अडथळा आणण्याचे काम करित असून यामध्ये होर्डिंग धारकांचासुद्धा समावेश असल्याने मनपा प्रशासनाकडून ७ होर्डिंग धारकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.



अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून देण्यात आली. याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले की, होर्डिंग, जाहिरात फलक धारकांनी आपल्या फलकांसमोरील वृक्षांची छाटणी किंवा तोडणी अनधिकृतरित्या करु नये. महापालिकेच्या परवानगीशिवाय वृक्षतोड केल्यास महाराष्ट्र शासन जाहिरात नियमन व नियंत्रण नियमानुसार जाहिरात फलक धारकाचा परवाना रद्द करुन जाहिरातदारा विरोधामध्ये सुध्दा कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून मंगळवार, १६ जानेवारी रोजी चिखली परिसरामध्ये अनधिकृतरित्या वृक्ष तोडणी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने विविध प्रयत्न करुनही जाणीवपुर्वक वृक्षतोड करण्याचे काम काही जणांकडून केले जात आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये रस्त्यालगत असलेले होर्डिंग दिसत नसल्यामुळे वृक्षांची संबंधित होर्डिंग धारकांकडून विनापरवाना वृक्ष छाटणी किंवा वृक्ष तोड केली जात आहे. अशा घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच विनापरवाना वृक्षतोडीबाबत नागरिकांकडून दैनंदिन सारथी वेबपोर्टलद्वारे, लेखी याबरोबरच इतर समाज माध्यमांद्वारे तक्रारी प्राप्त होत आहेत असे अतिरिक्त आयुक्त, प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले.

### वृक्षतोड करणाऱ्या ७ होर्डिंग धारकांवर गुन्हा दाखल

» अनधिकृत वृक्षतोड केल्याप्रकरणी आतापर्यंत ७ होर्डिंग धारकांवर पोलिसांच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, अनधिकृत वृक्षतोड केल्याप्रकरणी ९ कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याबाबत पत्रव्यवहारसुध्दा करण्यात आला असून काही प्रकरणांची तपासणी सुरू आहे. आजपर्यंत १० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. अशी माहिती उद्यान वृक्ष संवर्धन विभागाने दिली.

होर्डिंग किंवा जाहिरात फलकांसाठी विनापरवाना वृक्षांची वारंवार छाटणी किंवा वृक्ष पुर्णपणे काढले जात असल्याच्या घटना शहरात घडत आहेत. या प्रकरणी महापालिकेच्या वतीने होर्डिंग मालक व जाहिरातदारांविरोधात गुन्हा दाखल करुन महाराष्ट्र राज्य (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. संबंधित कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याबाबत पत्रव्यवहारही करण्यात आला असून याबाबत काही प्रकरणांमध्ये पोलिसांच्या वतीने गुन्हाही दाखल करण्यात आला आहे अशी माहिती रविकिरण घोडके, उप आयुक्त, उद्यान विभाग यांनी दिली.

# कसला शून्य कचरा प्रकल्प! कर्मचारीच बसतात पत्ते कुटत

## महापालिकेने जुगार अड्डा सुरू केलाय का? : नागरिकांचा सवाल

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या पाठीमागे राज्यातील पहिला शून्य कचरा प्रकल्प उपक्रम राबविला आहे; पण त्या प्रकल्पाच्या शेजारीच महापालिकेचे काही कर्मचारी पत्ते खेळत असल्याचे उघडकीस आले. त्यामुळे महापालिकेने शून्य कचरा प्रकल्पाऐवजी जुगार अड्डा सुरू केलाय का, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

महापालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या पाठीमागे शून्य कचरा प्रकल्प कार्यालयाशेजारी प्रशस्त कार्यालय, फॅन, खुर्च्या, टेबल आणि सोबतीला काही सवंगडी घेत महापालिकेचे कर्मचारी जुगार खेळत असल्याचे मंगळवारी (दि. १६) आढळून आले. जुगार खेळणारे बहुतांश कर्मचारी चतुर्थ श्रेणीतील आहेत. 'क' क्षेत्रीय कार्यालयातील



> “ महापालिकेच्या कार्यालयीन कामकाजावेळी जे कर्मचारी पत्ते खेळत असतील, त्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात येईल. दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल.
>
> –अण्णा बोदडे, सहायक आयुक्त, महापालिका

ड्रायव्हर, अतिक्रमणचे कर्मचारी, शिपाई, काही वर्ग तीनचे देखील कर्मचारी खेळण्यास येतात. आयुक्तच सुटीवर, तर कर्मचारी करणार काय? महापालिका आयुक्त कार्यालयात उपस्थितीत नसल्यामुळे सर्व विभाग-प्रमुख, उपायुक्त, सहायक आयुक्त, वर्ग तीन आणि चारचे कर्मचारी दिवसभर फिरत असतात. त्यामुळे टाइमपासच्या नावाखाली अनेक उद्योग महापालिकेत वाढू लागले आहेत, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

> “ निविदा प्रक्रिया न राबविता शून्य कचरा प्रकल्प कार्यालय उपक्रम राबविला; पण तेथे कर्मचाऱ्यांना पत्ते खेळण्याचा आणि जुगार अड्डा चालविण्याचा परवाना दिलाय का? याबाबत आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे तक्रार केली आहे. शून्य कचरा प्रकल्पाशेजारीच खतासाठी साठवण रुम तयार केली आहे. त्या रुममध्ये जुगार अड्डा सुरु आहे.
>
> –अमित मोहिते, शहर उपाध्यक्ष, सामूहिक गुंडगिरी, दहशतवाद, भ्रष्टाचारविरोधी संघटना

# शहरी गरीब कार्डचे आपोआप नूतनीकरण

## शहरी गरीब कार्ड पहिले चार महिनेच मिळणार

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

दवाखान्यामध्ये रुग्ण दाखल झाल्यानंतर दिल्या जाणार्या शहरी गरीब योजनेच्या कार्डमुळे लेखापरीक्षणात त्रुटी व अनियमितता निर्माण होत आहे. त्यामुळे शहरी गरीब योजनेचे कार्ड १ एप्रिल ते ३१ जुलै या चार महिन्यांतच दिली जाणार आहेत. यासंबंधीचा प्रस्ताव महापालिकेच्या आरोग्य विभागाने तयार केला असून, यावर अंशदायी वैद्यकीय समितीच्या (सीएचएस) बैठकीत शिक्कामोर्तब केले जाणार आहे. तसेच मूत्रपिंड विकार, हृदयरोग व कर्करोग हे आजार दीर्घकालीन असल्याने या रुग्णांच्या कार्डचे दरवर्षी आपोआप नूतनीकरण करण्याचाही विचार केला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शहरातील पिवळे, केशरी रेशन कार्ड, झोपडपट्टीमध्ये राहणारे सेवाशुल्कधारक आणि ज्यांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपये आहे,



अशा गरीब कुटुंबांसाठी महापालिकेकडून २०११ पासून शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना राबविली जात आहे. ज्यावेळेस ही योजना सुरू करण्यात आली, त्या वेळचे नागरिकांचे उत्पन्न आणि सध्याचे उत्पन्न यामध्ये मोठा बदल झाला आहे. या बाबींचा विचार करून शहरी गरीब योजनेचा लाभ घेण्यासाठी निश्चित केलेली वार्षिक उत्पन्नाची १ लाखाची मर्यादा वाढवून ती १ लाख ६० हजार करण्यात आली आहे. योजनेचे कार्ड असलेल्या कुटुंबातील व्यक्तींना महापालिकेच्या पॅनलवरील खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यासाठी एक लाखापर्यंत आर्थिक मदत मिळते. तसेच किडनी, हार्ट व कॅन्सर या दीर्घकालीन आजाराच्या उपचारासाठी वर्षाला दोन लाख रुपये मदत मिळते. योजनेतील गैरप्रकार टाळण्यासाठी सप्टेंबर २०२२ पासून योजनेमध्ये संगणक प्रणालीचा वापर केला जात आहे. त्यामुळे कागदपत्रांमधील अफरा-तफरी उजेडात आल्या आहेत. दरम्यान, अनेकवेळा रुग्ण दवाखाण्यात दाखल केल्यानंतर नातेवाईकांकडून शहरी गरीब योजनेचे कार्ड काढण्यासाठी धावपळ केली जाते. यामध्ये उत्पन्नाचा दाखला मिळण्यासाठी तीन चार दिवसांचा कालावधी लागतो. उत्पन्नाचा दाखला मिळवण्याठी केलेल्या अर्जाची टोकन पावती सादर केल्यानंतर ही माणुसकीच्या नात्याने योजनेचे सभासदत्व देऊन वैद्यकीय उपचारांची हमीपत्र दिली जातात. मात्र, काही तांत्रिक कारणामुळे अनेकवेळा उत्पन्नाचा दाखला तहसीलदारांकडून नाकारला जातो.त्यामुळे रुग्णाला घरी सोडले तरी महापालिकेकडे उत्पन्नाचा दाखला जमा होत नाही. शिवाय रुग्णाला दाखल केल्यानंतर कार्ड काढण्याच्या प्रक्रीयेत तीन चार दिवस जातात. मग या तीन चार दिवसांचे रुग्णालयाचे बिल अदा करताना महापालिकेला अडचणी येतात. तसेच आर्थिक वर्ष संपत असतानाही राजकीय दबावापोटी योजनेची कार्ड द्यावी लागतात. अशा कार्डांची बिले पुढील आर्थिक वर्षात येतात. या सर्व गोष्टींमुळे लेखापरीक्षणामध्ये त्रुटी व अनियमितता आढळून येते. अशा वेळी कार्ड व बिल मंजूर करणार्या अधिकार्यांना जबाबदार धरले जाते. या सर्व पार्श्वभूमीवर शहरी गरीब योजनेचे सभासद कार्ड संपूर्ण आर्थिक वर्षभर न देता केवळ १ एप्रिल ते ३१ जुलै या चार महिन्यातच देण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव आरोग्य विभागाने तयार केला असून तो नुकताच अतिरिक्त आयुक्तांपुढे ठेवण्यात आला आहे. यावर अंशदायी वैद्यकीय समितीच्या (सीएचएस) बैठकीत चर्चा करून शिक्कामोर्तब करण्यात येणार आहे.ज्यावेळेस ही योजना सुरू करण्यात आली.

### नूतनीकरण करण्याचा विचार

» किडनी, हार्ट व कॅन्सर आजारांवरील उपचारासाठी दोन लाखांपर्यंत मदत केली जाते. हे आजार दीर्घकालीन असल्याने संबंधित रुग्णांच्या कुटुंबास पुन्हा तीच कागदपत्रे सादर करण्याचे कष्ट पडू नयेत. त्यांचा त्रास वाचावा यासाठी दीर्घकालीन आजार असलेल्या कुटुंबाच्या सभासद कार्डांचे दरवर्षी आपोआप नूतनीकरण करण्याचा विचार सुरु आहे. यावरही अंशदायी वैद्यकीय समितीच्या बैठकीत शिक्कामोर्तब होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. तसेच मूत्रपिंड विकार, हृदयरोग व कर्करोग हे आजार दीर्घकालीन असल्याने या रुग्णांच्या कार्डचे दरवर्षी आपोआप नूतनीकरण करण्याचाही विचार केला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शहरातील पिवळे, केशरी रेशन कार्ड, झोपडपट्टीमध्ये राहणारे सेवाशुल्कधारक आणि ज्यांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपये आहे.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर उद्या सहा तास वाहतूक बंद राहणार

## मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर प्रवास करण्यापूर्वी आजच नियोजन करा!

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग उपनगरी रेल्वे कॉरिडोरच्या कामासाठी मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर उद्या (१८ जानेवारी) सहा तास वाहतूक बंद राहणार आहे. यामुळे या कालावधीत एक्स्प्रेसवर होणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर मुंबई मार्गिकेवर पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग उपनगरी रेल्वे कॉरिडोरचे काम करण्यात येणार आहे. चिखले ब्रिज याठिकाणी उद्या १८ जानेवारीला सकाळी ११ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत काम करण्यात येणार आहे. रेल्वे कॉरिडोरच्या कामामुळे मुंबई मार्गिकेवर सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे पुण्याकडून मुंबई बाजूकडे येणारी हलकी वाहने मुंबई मार्गिका किमी ५५.०० वर वळून मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरून मार्गस्थ करता येतील. ०७.५६० किमी (चिखले रेल्वे ओव्हर ब्रिज), यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग (मुंबई पुणे द्रुतगती मार्ग) १८ जानेवारी सकाळी ११:०० ते संध्याकाळी ५:०० पर्यंत १. एक्स्प्रेसवेवर पुण्यापासून मुंबईकडे जाणारी हलकी वाहने मुंबई लेन किमी ५५.००० बाहेर पडू शकतात आणि मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ द्वारे मार्गाचा अवलंब करू शकतात.२. द्रुतगती मार्गावर पुण्याहून मुंबईकडे जाणारी हलकी वाहने आणि बसेस मुंबई लेन ३९.८०० खोपोली बाहेर पडू शकतात आणि मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरून पुढे जाऊ शकतात. ३. पुणे ते मुंबई एक्स्प्रेसवेवरील सर्व प्रकारची वाहने खालापूर टोल गेटवरील शेवटच्या लेनचा वापर करू शकतात, किमी ३२.५०० ते खालापूर एक्झिटकडे वळतील आणि मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ खोपोली मार्गे शेडुंग टोल प्लाझा मार्गे जातील. ४. एक्स्प्रेसवेवर पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहने मुंबई लेन ९.६०० पनवेल एक्झिट वरून वळू शकतात आणि करंजाडे मार्गे कळंबोलीला जाण्यासाठी मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ चा वापर करू शकतात.५. मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरून पुण्याहून मुंबईकडे जाणारी सर्व वाहने शेडुंग फाट्यावरून पनवेलच्या दिशेने वळवली जातील.वाहतूक बंद केलेल्या तासांमध्ये एक्स्प्रेसवेवर मुंबई मार्गिकेवर हलक्या आणि अवजड वाहनांसह सर्व प्रकारच्या वाहनांना प्रतिबंधित केले जाईल. प्रवाशांनी त्यांच्या प्रवासाचे त्यानुसार नियोजन करावे आणि गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी मार्ग वापरावेत असे आवाहन करण्यात आले आहे.पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग उपनगरी रेल्वे कॉरिडोरच्या कामासाठी मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर उद्या (१८ जानेवारी) सहा तास वाहतूक बंद राहणार आहे. यामुळे या कालावधीत एक्स्प्रेसवर होणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर मुंबई मार्गिकेवर पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग उपनगरी रेल्वे कॉरिडोरचे काम करण्यात येणार आहे. चिखले ब्रिज याठिकाणी उद्या १८ जानेवारीला सकाळी ११ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत काम करण्यात येणार आहे.

# नवीन सहकार धोरणनिर्मितीत मेहता संस्थेची उत्तम भूमिका : वळसे पाटील

## ‘वैमनीकॉम’सारखी संस्था सहकार क्षेत्रासाठी दीपस्तंभासारखी

### या मान्यवरांची होती उपस्थिती

» ‘वैमनीकॉम’सारखी संस्था सहकार क्षेत्रासाठी दीपस्तंभासारखी काम करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहसंस्थेच्या ५७ व्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित समारंभात ते सोमवारी बोलत होते. या वेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळ (एनडीडीबी), आनंदचे अध्यक्ष डॉ. मीनेश शहा, सहकार आयुक्त अनिल कवडे, साखर आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक पी. एम. दिघे, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, वैमनीकॉमच्या संचालिका डॉ. हेमा यादव, वैमनीकॉमचे निबंधक आर. के. मेनन, सहप्राध्यापक यशवंत पाटील आदी उपस्थित होते.

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

केंद्र सरकारमार्फत आखण्यात आलेल्या नवीन सहकारी धोरणामध्ये सहकार चळवळ सशक्त बनवून तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे धोरण ठरविताना वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेने उत्तम भूमिका पार पाडली आहे, अशा शब्दांत सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी संस्थेचा गौरव केला. ‘वैमनीकॉम’सारखी संस्था सहकार क्षेत्रासाठी दीपस्तंभासारखी काम करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहसंस्थेच्या (वैमनीकॉम) ५७ व्या




स्थापना दिवसानिमित्त आयोजित समारंभात ते सोमवारी (दि.१५) बोलत होते. या वेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळ (एनडीडीबी), आनंदचे अध्यक्ष डॉ. मीनेश शहा, सहकार आयुक्त अनिल कवडे, साखर आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक पी. एम. दिघे, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, वैमनीकॉमच्या संचालिका डॉ. हेमा यादव, वैमनीकॉमचे निबंधक आर. के. मेनन, सहप्राध्यापक यशवंत पाटील आदी उपस्थित होते. विविध अभ्यासक्रमांत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले. या वेळी संस्थेच्या 'सहकार संदर्भ (को-ऑपरेटिव्ह पर्सपेक्टिव्ह)' जर्नलचे प्रकाशनही उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. ‘सहकार से समृद्धी’ अंतर्गत देशपातळीवर विविध संस्थांसाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत आहेत. कृषी पतसंस्थांना सी. एस. सी. केंद्र, पेट्रोल पंप, गॅस वितरण सेवा, जन औषधी केंद्र आदी वेगवेगळे १५२ प्रकारचे उद्योग सुरू करण्याची संधी मिळाली आहे. महाराष्ट्र यात देशपातळीवर अग्रेसर राहिलेला असून, देशातील सर्वांत मोठ्या सहकार विद्यापीठाची निर्मिती होणार असल्याचेही पाटील यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, ऊर्जा क्षेत्राबाबतही विद्यापीठामार्फत काम केले जात असून, जगात हायड्रोजन ऊर्जेचा वापर हरित ऊर्जा म्हणून यापुढे जास्त झाला पाहिजे. संचालक डॉ. हेमा यादव स्वागत केले. या वेळी डॉ. यशवंत पाटील यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला.

# प्रवासात विघ्न अन् गैरसोयींची मालिका कायम

## पुणे विमानतळ की एसटी स्टँड; प्रवाशांचे हाल सुरूच

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

उत्तरेतील राज्यांतील धुक्यामुळे सलग चौथ्या दिवशी बुधवारी पुणे विमानतळावरील विमान सेवेला फटका बसला. पुणे विमानतळावरून जाणारे एक आणि येणारी दोन विमाने रद्द करण्यात आली. मागील काही दिवसांपेक्षा विमान रद्द होण्याचे प्रमाण कमी असले, तरी विमानतळावरील सेवेतील गोंधळामुळे प्रवाशांना गैरसोईचा सामना करावा लागला. विमानसेवेला उत्तरेतील धुक्याचा बसणारा फटका काही प्रमाणात आता कमी झाला आहे. त्यामुळे पुणे विमानतळावरील तीन विमाने रद्द करण्यात आली. त्यात पुणे ते गुवाहाटी, गुवाहाटी ते पुणे, वाराणसी ते पुणे या तीन विमानांचा समावेश आहे. देशात उत्तरेत धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने रविवारपासून विमाने रद्द होण्याचे प्रमाण वाढले होते. अनेक




विमानांना पाच ते सहा तासांहून अधिक विलंब होत होता. खराब हवामानाचा विमानसेवेला बसणारा फटका आता कमी झाला आहे. विमाने रद्द होण्याचे प्रमाण कमी झाले असले, तरी विमानतळावरील नियोजनाचा फटका प्रवाशांना बुधवारी बसला. अनेक प्रवाशांनी याबाबत समाजमाध्यमांवर तक्रारी केल्या आहेत. विमानतळावर चेक इन करण्यासाठी एक तासाहून अधिक काळ रांगेत थांबावे लागल्याची तक्रार प्रवाशांनी केली आहे. विमान कंपन्यांच्या सेवेवरही अनेक प्रवाशांनी ताशेरे ओढले आहेत. विमान कंपन्या आणि विमानतळावरील सेवेच्या गोंधळामुळे प्रवाशांना मनस्ताप झाला. डिजियात्राचा वापर प्रवाशांसाठी ऐच्छिक असतानाही प्रवाशांना त्याची सक्ती केली जात असल्याचा अनुभव अनेक जणांनी मांडला आहे.त्यामुळे पुणे विमानतळावरील तीन विमाने रद्द करण्यात आली. त्यात पुणे ते गुवाहाटी, गुवाहाटी ते पुणे, वाराणसी ते पुणे या तीन विमानांचा समावेश आहे. देशात उत्तरेत धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने रविवारपासून विमाने रद्द होण्याचे प्रमाण वाढले होते. अनेक विमानांना पाच ते सहा तासांहून अधिक विलंब होत होता.